महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडबिंदे

बुधवार ❖ २५ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १८० ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

# राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

## खातेवाटपानंतर प्रशासनातही खांदेपालट

१. श्री अनिल डिग्गीकर महाव्यवस्थापक, एँऊ, मुंबई यांची अतिरिक्त मुख्य सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२. डॉ. हर्षदीप कांबळे प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांची महाव्यवस्थापक, बेस्ट, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

३. डॉ.अनबलगन पी. चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, मुंबई यांची सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

४. डॉ. राधाकृष्णन बी. मुख्यमंत्र्यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई यांची महागेन्को, मुंबईचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

५. श्री संजय दैने जिल्हाधिकारी, गडचिरोली यांची आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

६. श्री राहुल कर्डिले जिल्हाधिकारी, वर्धा यांची महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

७. श्रीमती वनमथी सी. सह आयुक्त, राज्य कर यांची जिल्हाधिकारी, वर्धा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

८. श्री संजय पवार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांची सहआयुक्त, राज्य कर, मुंबई या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

९. श्री अवश्यंत पांडा, आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांची जिल्हाधिकारी, गडचिरोली म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१०. श्री विवेक जॉन्सन यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

११. श्री. अण्णासाहेब दादू चव्हाण (पदोन्नती) उपायुक्त (महसूल) पुणे विभाग, पुणे यांची महात्मा फुले जिवंदाई आरोग्य योजना सोसायटी, मुंबई येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१२. श्री. गोपीचंद मुरलीधर कदम (पदोन्नती) यांची स्मार्ट सिटी, सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**मुंबई :** मंत्रिमंडळ खातेवाटप झाल्यानंतर राज्यात प्रशासकीय बदलास सुरुवात झाली असून १२ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या राज्य शासनाकडून करण्यात आल्या आहेत. दिव्यांग कल्याण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी अनिल डिग्गीकर यांची बदली करण्यात आलेली आहे तर बेस्टमध्ये खांदेपालट करताना नवे महाव्यवस्थापक हर्षदीप कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव राधाकृष्णन यांची महाजेनकोच्या अध्यक्षपदी बदली करण्यात आलेली आहे. महाजेनकोचे अध्यक्ष अनबाल्गन यांच्याकडे आता उद्योग विभागाच्या सचिव पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय दैने यांच्याकडे कडे नागपूर टेक्सटाईल आयुक्त पदाची धुरा असणार आहे तर आयुक्त अविशांत पांडा यांची गडचिरोलीच्या जिल्हाधिकारी पदावर बदली करण्यात आली आहे.

वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिलेंची नाशिक महापालिका आयुक्तपदी बदली झालेली आहे तर राज्य कर सहआयुक्त सी वनमाती यांची वर्ध्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सा वनमाती यांच्या जागी चंद्रपूर जिल्हा परिषदेचे सीईओ संजय पवार यांची वर्णी लागलेली आहे.विवेक जोन्सन हे चंद्रपूरचे नवे जिल्हा परिषद सीईओ असणार आहेत.

पुणे विभागीय महसूल उपायुक्त अण्णासाहेब चव्हाण यांची महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेच्या सीईओपदी बदली करण्यात आलेली असून गोपीचंद कदम यांना सोलापूर स्मार्ट सिटी सीईओपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे.



# नायर रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभाग बंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**मुंबई :** आठवडाभरापासून नायर रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया विभागातील काही भाग बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे बायपाससारख्या शस्त्रक्रिया होत नसल्याने रुग्णांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शस्त्रक्रिया विभागासाठी लागणाऱ्या उपकरणांची देयके प्रलंबित राहिल्यामुळे कंत्राटदारांनी उपकरणांचा पुरवठा बंद केला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयामध्ये १८०० खाटा असून दररोज साडेतीन ते चार हजार रुग्ण बाह्यरुग्ण विभागामध्ये उपचारासाठी येतात. हृदय शस्त्रक्रिया विभागामध्ये दररोज उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. यापैकी काही रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. हृदय शस्त्रक्रियेसाठी लागणारी महत्त्वपूर्ण उपकरणे नायर रुग्णालय प्रशासनाकडून पुरविण्यात येतात. मात्र रुग्णालयाला ही उपकरणे पुरविणाऱ्या कंत्राटदारांची देयके मागील काही दिवसांपासून प्रलंबित आहेत. देयके मंजूर होत नसल्याने कंत्राटदारानी उपकरणांचा पुरवठा आठवडाभरपूर्वी अचानक बंद केला. त्यामुळे रुग्णालयामध्ये होणाऱ्या शस्त्रक्रियांपैकी बायपास शस्त्रक्रिया आठवडाभरापासून बंद करण्यात आल्या आहेत. अचानक घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे रुग्णांना नाहक त्रास होत आहे. त्यांना शस्त्रक्रियेसाठी खासगी रुग्णालयात जावे लागत आहे. कंत्राटदाराकडून उपकरणांचा पुरवठा बंद झाल्याने शस्त्रक्रिया बंद कराव्या लागल्याची माहिती नायर रुग्णालयातील सीव्हीटीएस विभागातील एका डॉक्टरने दिली.

### बायपास शस्त्रक्रिया होत नसल्याने रुग्णांचे हाल

### देयके प्रलंबित असल्याने कंत्राटदारांकडून उपकरणांचा पुरवठा बंद?

संपूर्ण शस्त्रक्रिया विभाग बंद झाला नसून, फक्त बायपास शस्त्रक्रिया बंद झाल्या आहेत. देयके मंजूर करण्याचे काम लेखा विभागाचे आहे. निवडणुकीच्या कामामुळे देयके मंजुरीला विलंब झाला असला तरी आता सर्व देयके मंजूर करून बँकेकडे पाठविण्यात आली आहेत. मात्र बँकेकडून देयकांची रक्कम अद्याप कंत्राटदाराच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आलेली नाहीत. या संदर्भात बँकेला देयकांची रक्कम तातडीने कंत्राटदारांना वर्ग करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे लवकरच कंत्राटदारांना त्यांच्या देयकाची रक्कम मिळेल आणि लवकरच शस्त्रक्रियागृहातील सुविधा सुरळीत होईल, अशी माहिती नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेश मोहिते यांनी दिली.

नायर रुग्णालयामध्ये डॉक्टरांकडून उपचार मिळत असले तरी औषधे बाहेरून खरेदी करावी लागतात. कॅल्शियमची औषधे, सिरींज, सुई, सलाईन, ग्लोव्हज, वेदनाशामक औषधे आदी बाहेरून खरेदी करावे लागत आहे. तसेच रुग्णालयातील एमआरआय यंत्रणा मागील अनेक महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे रुग्णांना ही चाचणी खासगी केंद्रांमध्ये करावी लागते. त्यामुळे आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याचे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांनी सांगितले.

> नायर रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया आठवडाभरापासून बंद आहेत. कारण शस्त्रक्रियेसाठी लागणारे सामान पुरवणारया पुरवठादाराची बिले मंजूर झालेली नाहीत. त्यामुळे शस्त्रक्रिया बंद आहेत. नायर हे मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वाचे रुग्णालय आहे. बरेच मुंबईकर नायर रुग्णालयात उपचार घेत असतात. मुंबईतील प्रचंड ताणतणावामुळे हृदयरोगाचे प्रमाण वाढले आहे. अशा परिस्थितीत तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे, अशी मागणी आमदार सुनील शिंदे यांनी विधान परिषदेत माहितीच्या मुद्द्याद्वारे केली केली होती त्यावेळेस मंत्री गिरीश महाजन यांनी येत्या दोन दिवसांत त्यावर उपाययोजना होईल, असे आश्वासन दिले होते.



# गुणवत्ता वाढीसाठी जिल्हा परिषदेची नवी 'दिशा'

> ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करुन त्यांना प्रवेश दिला जातो. तसेच बिक्र टू इंक आणि नव साक्षरता अभियान देखील राबविले जात आहेत. या उपक्रमांसह यंदाच्या वर्षी दिशा उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नक्कीच भविष्यात शाळांमधील पटसंख्या वाढण्यास मदत होणार आहे.
>
> - रोहन घुगे, मुख्यकार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**ठाणे :** जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढावी त्याचबरोबर शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी जिल्हा परिषदेकडून विविध प्रयत्न केले जात आहेत. या पार्श्वभूमीवरच काही महिन्यांपूर्वीपासून दिशा प्रकल्प राबविण्यास सुरुवात झाली आहे. या प्रकल्पात जिल्हा परिषदेच्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा अध्ययन स्तर ओळखून त्याला वैयक्तिकृत शिक्षण दिले जात असल्याची माहिती जिल्हा परिषदेकडून देण्यात आली.

आपल्या पाल्याला चांगल्या दर्जेच्या शाळेत शिक्षण मिळावे यासाठी प्रत्येक पालकांची धडपड सुरु असते. परंतू, चांगल्या दर्जेच्या शाळेत शिक्षण घ्यायचे म्हटले तर, शैक्षणिक खर्चाचा पहिला प्रश्न निर्माण होतो. विशेष करुन ही परिस्थिती ग्रामीण भागात पाहण्यास मिळते. ग्रामीण भागातील अनेक कुटूंबाचा उदरनिर्वाह रोजंदारीवर सुरु असतो. त्यामुळे या कुटूंबातील मुलांना शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत घ्यावे लागते. परंतू, जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था, शिक्षकांची कमतरता, शैक्षणिक साहित्याची वाणवा यामुळे या शाळेत आपल्या पाल्याला कसे शिक्षण मिळेल याची खंत पालकांमध्ये असते. त्यामुळे या शाळांची पटसंख्येत वाढ होत नाही.

ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या १ हजार ३२७ शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या संकल्पनेतून गेल्या काही महिन्यांपासून दिशा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दर महिन्याला ७२ हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहोत. प्रत्येक विद्यार्थ्याचा अध्ययन स्तर ओळखून त्याला वैयक्तिकृत शिक्षण दिले, तरचं १०० टक्के मुलांचा विकास साधता येईल, असा या उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रक्रियेतून जर विद्यार्थी सर्व स्तरापर्यंत पोहोचला तर, त्याची वेगवेगळ्या सर्वांगीण विकासासह स्पर्धा परिक्षांची तयारी करुन घेतली जाणार आहे. या उपक्रमामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढण्यासही मदत होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेमार्फत देण्यात आली.

### जिल्हा परिषदेच्या दिशा उपक्रमामुळे शाळांची पटसंख्या वाढण्यास मदत



### दिशा उपक्रम म्हणजे नक्की काय? व तो कसा राबववितात

ज्या विद्यार्थ्यांना वाचता येत नाही, अशा विद्यार्थ्यांकडे जास्त लक्ष दिले जाते. मराठी, इंग्रजी किंवा गणित अशा प्रत्येक विषयाचे सहा स्तर ठरविले आहेत. त्यामध्ये अक्षर, शब्द, वाक्य, परिच्छेद, गोष्ट आणि श्रुत लेखन असे स्तर आहेत. प्रत्येक विद्यार्थी हा कोणत्या स्तरावर आहे याची चाचणी दर महिन्याला घेतली जाते. एका स्तरवरुन पुढच्या स्तरावर जाण्यासाठी त्याला वैयक्तिकृत शिक्षण दिले जाते.

यासाठी एआय (कृत्रीम बुद्धिमत्ता) या तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. तसेच ॲप्लिकेशन तयार केले असून त्या माध्यमातून एका विद्यार्थ्याचे आकलन क्षमता ओळखण्यासाठी तीस सेकंदाचा कालावधी लागतो. ही सर्व प्रक्रिया व्यवस्थित पार पडते की, नाही हे पाहण्यासाठी १२० पर्यवेक्षिकांची समिती नेमलेली आहे. या समितीला दर महिन्याला शाळांना भेटी देण्याच्या तारखा दिल्या आहेत. या समितीने शाळेला भेटी दिल्यानंतर त्यांना अहवाल ॲप्लिकेशनवर समाविष्ट करायचा आहे.

# जलमार्ग आणि प्रवासी सुरक्षा ऐरणीवर !



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ उरण प्रतिनिधी**

उरण : बुधवारी अरबी समुद्रात झालेल्या प्रवासी बोट अपघातानंतर वर्षानुवर्ष सुरू असलेल्या जलमार्ग आणि प्रवासी सुरक्षा ऐरणीवर आली आहे. यात समुद्रातील वाढत्या वर्दळीमुळे हा जलमार्ग धोकादायक बनू लागला आहे. अपघाताच्या घटनेनंतर शासनाकडून प्रवासी सुरक्षेची दक्षता घेतली जात आहे. यात जलमार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लाईफ जॅकेटची सक्ती करण्यात आली आहे. परंतु प्रवासी बोटीत जॅकेट असले तरी ते न घालताच प्रवास केला जात असल्याची स्थिती आहे. प्रवासी बोटीना सुरक्षेसाठी करण्यात आलेली सक्ती ही कायम राहणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे. अपघात झाला त्या मार्गावरून उरण, अलिबाग आणि नवी मुंबई येथील प्रवासी बोटी दररोज प्रवास करीत आहेत. यातील सर्व जलवाहतूक ही वर्षभर सुरू असते. मात्र या घटनेनंतर पुन्हा एकदा या जलमार्गावरील सुरक्षा ऐरणीवर आली आहे. उरणच्या मोरा ते मुंबई दरम्यानची जलवाहतूक पावसाळ्यातही सुरू असते. तसेच मुंबई ते अलिबाग दरम्यान जलसेवा आहे. मात्र चार महिने तुलनेने कमी प्रवासी या मार्गाने प्रवास करतात. त्याचप्रमाणे पावसाळ्यातील बदलत्या हवामानामुळे ही सेवा खंडित करावी लागते. अशा स्थितीत ही समुद्रातील लाटांचा सामना करीत ही सेवा सुरू असते. त्याचप्रमाणे बेलापूर ते मुंबई अशीही जलसेवा आहे. यात जेएनपीए बंदर ते गेटवे ऑफ इंडिया अशी जलसेवा आहे. या जलसेवेचा उपयोग बंदरातील कर्मचारी व कुटुंबीय, तसेच येथील खासगी बंदर आणि बंदरावर आधारित उद्योगातील कामगार करतात.




# वन विभागाचे बंधारे गेले वाहून

### पाणी अडवा पाणी जिरवा कागदावरच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** तालुक्यातील फॉरेस्ट विभागाने आपल्या ठराविक ठेकेदाराकडून बांधलेले बंधारे एकच पावसात वाहून गेले आहेत.निकृष्ट बांधकाम आणि फक्त कागदोपत्री काम या धोरणामुळे तालुक्यातील बंधारे फक्त बिले काढण्यासाठी बांधले जातात. हे बंधारे खालून पाणी जाणे, वरून बंधारा बांधणे अशी कामे वर्षानुवर्षे हेच ठेकेदार करत आहेत. यात ना पाणी आडत ना पाणी जिरत मात्र पैसा खर्च मात्र होतो आहे.असली कामे कल्याण तालुक्यात होत आहेत, तर अन्य तालुक्यात काय स्थिती असणार आहे. येथील वन विभागाचे अधिकारी मुद्दाम दुर्लक्ष करतात का? अशी चर्चा हे बंधारे पाहून नागरिक आपसात करत आहेत.

## मुरबाडमध्ये उद्या
# स्वामी नरेंद्र महाराजांचा पादुका दर्शन सोहळा
### शेकडो अनुयायी उपासक दीक्षा घेणार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुरबाड(बाळासाहेब भालेराव)**

दि.२५ :अंनत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांनी दिलेल्या 'तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा' या शिकवणीतून स्व-स्वरूप संप्रदाय, जिल्हा ग्रामीण ठाणे भक्त सेवा मंडळाच्या वतीने जगद्गुरुश्रींच्या सिद्ध पादुका दर्शन व गुरुपूजन सोहळयाचे भव्य आयोजन मुरबाड नगरीत येत्या गुरुवार २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजल्यापासून कुणबी समाज हॉल साजईफाटा, मुरबाड येथे करण्यात आले आहे.

या पादुका दर्शन सोहळयाप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत ज.न.म. संस्थानाच्या सामाजिक उपक्रमांतर्गत गोरगरीब, गरजू महिलांना मोफत शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे. तरी या महनमंगल प्रसंगी आपण सहकुटुंब, सहपरिवार, इष्टमित्र,आप्तेष्टांसह या आध्यात्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहून पादुका दर्शनाचा लाभ घ्यावा असे विनम्र आवाहन स्व-स्वरूप संप्रदाय जिल्हा ग्रामीण ठाणे भक्त सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वरूप संप्रदाय जिल्हा ग्रामीण ठाणे भक्त सेवा मंडळांतर्गत कल्याण,डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर, शहापूर, मुरबाड आदी तालुका परिसरात घरोघरी पादुका दर्शन सोहळयाचा प्रचार-प्रसार शिगेला पोहोचला आहे. हजारोंच्या संख्येने भक्त,साधक,शिष्यांच्या सहभागाने अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या सिद्ध पादुका आलिशान रथात आरुढ करून मुरबाड शहरातून कार्यक्रमाच्या स्थळापर्यंत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या

### सामाजिक उपक्रमांतर्गत शिलाई मशीनचे वाटप!

मिरवणुकीत सुश्राव्य भजन, नाम गजर, मंगल वाद्यांचा सूरताल , भगव्या पताका, पारंपारिक वेशभूषा, टाळ मृदुंगांच्या वाद्यात भजनी पथके, कलशधारी स्त्रिया, निषाणधारी, विविध कला नृत्य, काही क्षण देखावे, रस्त्यांच्या दुतर्फा रांगोळया, लेझीम, फुगड्या व पारंपारिक नृत्य अशा विविध अंगाने नटलेल्या या पालखी मिरवणुकीत असंख्य भक्त, साधक, शिष्यांचा मेळा सहभागी होऊन पादुका दर्शन सोहळयात सन्मिलित होणार आहे.

मुरबाड नगरीत २६ डिसेंबर रोजी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानाच्या पुरोहितांकडून वेदोक्त मंत्रोच्चारात सिद्ध पादुकांच्या पूजनानंतर शेकडो अनुयायींना उपासक दीक्षा दिली जाणार आहे. त्यानंतर संस्थानाकडून प्रवचन सेवा, भजन सेवा होणार आहे, आलेल्या सर्व भाविक भक्तगणांना महाप्रसादाची व्यवस्था स्व-स्वरूप जिल्हा ग्रामीण ठाणे भक्त सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. हिंदू धर्म संस्कृतीत पादुका दर्शनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिवाची ही परंपरा असल्याने तुमच्या कुलदेवतेचे ही स्मरण करत, पादुकांची पूजा करताना प्रत्यक्ष श्री सद्गुरुना स्पर्श होत असल्याने एक सात्विक आनंद मिळतो. तुम्ही काही मागितले नाही तरी परमपूज्य सद्गुरु मात्र जे योग्य तेच देतात, तुमचे अनेक प्रश्न मार्गी लागतात, संकटे आली तरी त्यातून तरून जाण्याची शक्ती प्राप्त होते. तुमच्या चित्ताला एक प्रकारे समाधान लाभते. अशा असंख्य जनाना आलेल्या अनुभूतीने अनेक पिढ्यांची ही पादुका दर्शन परंपरा भारत वर्षात सुरू आहे. त्यास अनुसरून दक्षिणकाशी रामानंदाचार्य पिठाचे जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या दिव्य सिद्ध पादुका दर्शनाचा सोहळा गेल्या अनेक वर्षांच्या परंपरेने सुरू असल्याचे ठाणे जिल्हा ग्रामीण निरीक्षक मनोज परब, जिल्हा अध्यक्ष अरविंद कासले, सामाजिक उपक्रम प्रमुख अविनाश शिरोशे, तालुकाध्यक्ष भरत सासे,उत्सव समिती अध्यक्ष नारायण आगिवले , प्रसिद्धी प्रमुख अशोक नाईक यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला वित्त-नियोजन व उत्पादनशुल्क विभागाचा आढावा

### करचोरी, करगळती रोखण्याबारोबर परिणामकेंद्रित काम करा –उपमुख्यमंत्री अजित पवार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी) :**

दि.२५ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'वित्त व नियोजन'सह 'राज्य उत्पादन शुल्क' यादोन्ही विभागांची आज आढावा बैठक घेतली.

श्री पवार यांनी कर संकलन आणि महसुलवाढीच्या प्रक्रियेत सुसुत्रता, सुधारणा आणत परिणामकेंद्रित काम करण्याचे निर्देश यावेळी दिले. अधिकाऱ्यांनी पारदर्शकतेवर भर देऊन करचोरी, करगळती रोखण्याच्या कामात हयगय करु नये, असे यावेळी सांगितले.

यावेळी वित्त व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ॲड. अशिष जयस्वाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वस्तू व सेवा कर विभागाचे राज्य आयुक्त आशीष शर्मा, वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा) सचिव शैलजा ए., लेखा व कोषागारे विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपसचिव रविंद्र औटे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सह आयुक्त विश्वनाथ इंदिसे, सहआयुक्त सुनिल चव्हाण, अपर आयुक्त यतीन सावंत, उपायुक्त सुभाष बोडखे, उपायुक्त शंकर जगताप आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीदरम्यान प्रलंबित योजना, आवश्यक निधी, राज्याच्या उत्पन्नाचा आढावा घेतला. राज्यातील महसुली सुधारणा, शेती विकास, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यांसारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. श्री. पवार यांनी यावेळी शेतकऱ्यांच्या आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी वित्तीय योजना आणण्यावर भर देण्याच्या सूचना दिल्या.

# राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणासाठी अधिकाऱ्यांना सहकार्य करावे

### -राष्ट्रीय सांख्यिकी उपसंचालक श्रीमती सुप्रिया रॉय




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ नवी मुंबई(प्रतिनिधी) :**

दि.२५ : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाद्वारे राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या माध्यमातून जनतेच्या आरोग्याची माहिती गोळा केली जाणार आहे. ही माहिती गोळा करण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना जनतेने सहकार्य करावे.असे आवाहन राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय मुंबईच्या उपसंचालक श्रीमती सुप्रिया रॉय यांनी केले.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या वतीने ०१ जानेवारी २०२५ पासून सुरु होणाऱ्या 'घरगुती सामाजिक वापर-आरोग्य आणि संपूर्ण मॉड्यूल सर्वेक्षण टेलिकॉम' या ८० व्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या अनुषंगाने पश्चिम महाराष्ट्र क्षेत्रातील फिल्ड ऑपरेशन विभागासाठी केंद्र सरकार कार्यालये (CGO COMPLEX), सीबीडी बेलापूर, नवी मुंबई या ठीकाणी २३ ते २६ डिसेंबर २०२४ या कालावधीत नमुना सर्वेक्षणासाठी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय मुंबईच्या उपसंचालक श्रीमती सुप्रिया रॉय यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या.यावेळी केंद्रीय सरकार स्वास्थ्य योजना (CGHS) चे मुख्य वैद्यकीय अधिकारी, डॉ. सचिन गायकवाड, NIC शास्त्रज्ञ-फ आनंद एस लाधे, संयुक्त संचालक श्रीमती आर. पी. थोटे, महाराष्ट्र राज्य अर्थ सांख्यिकी विभागाचे उपसंचालक एस. सी. लाढे, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे सहायक संचालक के. राजगोपाल आणि ठाणे उप क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक संचालक एच. व्ही. रभडिया तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रशिक्षण शिबीरात मार्गदर्शन करताना उपसंचालक श्रीमती सुप्रिया रॉय म्हणाल्या की, या सर्वेक्षणाचे मुख्य उद्दिष्ट देशाच्या विविध भागांतील रोगांचा दर, सार्वजनिकआणि खासगी आरोग्य सेवा वापरण्याचे प्रमाण, 'बाह्यखर्च' आणि शासकीय आरोग्य विमा योजनांचा उपयोग, संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण इत्यादींबाबत माहिती संकलितकरणे आहे. संपूर्ण मॉड्यूल टेलिकॉम सर्वेक्षण संबंधित निर्देशक तसेच माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) कौशल्यावर आधारित माहिती प्रदान करेल. संकलित केलेली माहितीचा उपयोग जागतिक निर्देशकांच्या अहवालासाठी केला जाणार आहे. यासाठी सार्वजनिक सहकार्य आवश्यक असून, सर्वेक्षणासाठी मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्यांना जनतेने सुसंस्कृतपणे आणि धैर्याने योग्य उत्तर देण्याची आवश्यकता आहे. यावेळी श्रीमती सुप्रिया रॉय यांनी आरोग्य संबंधित सर्वेक्षणा बद्दल माहिती दिली.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण हे देशाच्या विकासासाठी धोरणे तयार करण्यासाठी आणि संशोधनासाठी महत्वाच्या माहितीचे स्त्रोत आहे. या प्रशिक्षण शिबिरामुळे सर्वेक्षणाच्या विविध तांत्रिक बाबींबद्दल चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ मिळेल. असे ही त्या यावेळी म्हणाल्या.

केंद्रीय सरकार स्वास्थ्य योजना (CGHS) चे मुख्य वैद्यकीयअधिकारी डॉ.सचिन गायकवाड यांनी यवेळी आरोग्य संबंधित सर्वेक्षणाचे महत्त्व देशाच्या समग्र विकासासाठी कसे महत्त्वाचे आहे.हे अधोरेखित केले. हे सर्वेक्षण देशातील श्रमशक्ती, रोजगार आणि बेरोजगारी संरचनवरील प्रमुख सांख्यिकी स्रोत आहे.

या सर्वेक्षण शिबीरात महाराष्ट्र राज्य शासनाच्या अर्थ सांख्यिकी आणि सांख्यिकी संचालनालयाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य एजन्सींनी अनुसरण केलेल्या सर्वेक्षणाच्या प्रक्रियांमध्ये एकसारखेपणा राखण्यात मदत होणार आहे. या क्षेत्रीय प्रशिक्षण शिबिरात राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, मुंबई आणि ठाणे येथून सुमारे १०० फील्ड अधिकारी उपस्थित होते.

## वाचक मनोगत
### शिक्षणात परीक्षा ही हवीच !

सरसकट उत्तीर्ण धोरण रद्द करण्याचा केंद्र शासनाने घेतलेला निर्णय अत्यंत योग्य आणि स्तुत्य असाच आहे मात्र केवळ पाचवी व आठवीसाठी हा निर्णय न ठेवता तो पूर्वीप्रमाणे सर्व विषयांसाठी असावयास हवा. सुरुवाती पासूनच शैक्षणिक पाया मजबूत करण्यासाठी, शिक्षणाची एक एक पायरी गाठण्यासाठी परीक्षा ही संकल्पना महत्त्वपूर्ण असून त्याचे गांभीर्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रारंभ पासूनच समजणे तितकेच महत्त्वाचे आहे. देशातील सर्वच राज्यांनी हे धोरण स्वीकारणं आवश्यक असल्याचे वाटते.

**- विश्वनाथ पंडित,ठाणे**

# श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल राज्यपालांना शोक

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी) :**

दि.२५ : ज्येष्ठ चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक पद्मभूषण श्याम बेनेगल यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. देशातील निवडक विचारवंत चित्रपट निर्मात्यांच्या यादीत श्री श्याम बेनेगल यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. समांतर चित्रपटातील आपल्या वैशिष्ट्यपूर्ण योगदानाद्वारे त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर आपली अमिट छाप सोडली.

अंकुर, निशांत आणि मंथन यांसारख्या उत्कृष्ट कलाकृतींच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक वास्तवाचे चित्रण मांडण्याचे धैर्य दाखवले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्रतिभावंत कलाकार जगासमोर आले. 'भारत एक खोज' या ऐतिहासिक दूरदर्शन मालिकेच्या माध्यमातून त्यांनी लाखो प्रेक्षकांना भारताच्या गौरवशाली इतिहासाची नव्याने ओळख करून दिली. त्यांच्या निधनामुळे अनेक चित्रपट निर्मात्यांना प्रेरणादायक असणारा एक प्रतिभावंत निर्माता - दिग्दर्शक गमावला आहे. मी दिवंगत श्री श्याम बेनेगल यांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांना आणि चाहत्यांना आपल्या शोक संवेदना कळवतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) :**

दि.२५ : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना **Combined Defence Service (CDS)** या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दि.२० जानेवारी २०२५ ते ०४ एप्रिल २०२५ या कालावधीत **CDS** कोर्स ६४ आयोजित करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

ठाणे/पालघर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे येथे दि. १३ जानेवारी २०२५ रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी **Department of Sainik Welfare, Pune(DSW)** यांच्या वेबसाईट वर सर्च करुन त्यामधील **CDS-**६४ कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेवून व ते पूर्ण भरुन सोबत घेवून यावे. या **CDS** वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी पुढील नमूद पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेवून यावेत :-अ) उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. आ) उमेदवार लोकसंघ आयोग **(UPSC)** नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या या परीक्षेकरीता ऑनलाईन द्वारे अर्ज केलेला असावा.अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई-मेल आय डी **training.petenashik@gmail.com** व दूरध्वनी क्र.०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअॅप क्र. ९१५६०७३३०६ (प्रवेशपत्र मिळविण्यासाठी) असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मेजर प्रांजळ जाधव (निवृत्त)यांनी केले आहे.

## हरित उर्जेच्या माध्यमातून
# महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील
### -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी) :**

दि.२५ : राज्यभरात सौर उर्जेचा वापर करणारे सौर ग्राम तयार करण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबरठा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर-सिंह, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत आणि मोफत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना १६ हजार मेगावॅट इतकी वीज देतो. हे सर्व फीडर सौरऊर्जेवर आणण्याचे काम दोन वर्षापासून सुरू केले आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फिडर सौर उर्जेवर आणण्यात येतील. शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होऊ शकेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला उंबरठा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

## नवी मुंबई वैधमापनशास्त्र यंत्रणा विभागाकडून
# राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :**

दि.२५ : राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व संरक्षण विभाग तसेच वैधमापनशास्त्र यंत्रणा विभाग, नवी मुंबई यांच्यामार्फत वाशी येथे नागरिकांना ग्राहक हक्कांविषयी तसेच वस्तूंवरील वजन इ. माहितीबाबत जनजागृती करण्यात आली.

बाजारात विक्रीसाठी असणाऱ्या वस्तूंच्या आवरणावर एमआरपी, वजन, उत्पादनाची तारीख, पॅकेर्सवर पूर्ण पत्ता, ग्राहक, ई-मेल, दूरध्वनी क्रमांक इ. प्रिंट करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र नागरिक या सूचना तपासून घेत नसल्याने अनेकदा ग्राहकांची फसवणूक होते. महाराष्ट्र शासनाचा वैधमापनशास्त्र विभाग अशा व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवते. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची व विक्रेत्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी दरवर्षी दि.२४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ग्राहकहिताची जनजागृती करणारे कार्यक्रम राबविले जातात. या जनजागृतीचा एक भाग म्हणून वैधमापन शास्त्र विभागाच्या वतीने स्टॉल लावून वजनकाटे, मापे, आवेष्ठित वस्तू उत्पादनांवरील आवश्यक माहिती इ. बद्दल प्रात्याक्षिके माहितीसह देण्यात आली.

तसेच ग्राहक जनजागृती माहितीपत्रके वाटण्यात आली.

हा कार्यक्रम वैधमापनशास्त्र यंत्रणा उपनियंत्रक, ठाणे जिल्हा क्रमांक २ सुहास कुटे यांच्या मार्गदर्शना खाली वाशी १ आणि ४ विभागाचे निरीक्षक एम. एच तडवी, वाशी २ विभागाचे निरीक्षक हेमंत कुलथे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्षेत्र सहाय्यक अनंत पाडवी, कर्मचारी रमाकांत गाडेकर यांनी परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनी नागरीकांनी उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद दिला तसेच उपयुक्त माहिती मिळाली म्हणून यंत्रणेचे अधिकारी कर्मचारी आभार मानले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातींना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com




२५ डिसेंबर २०२४
बुधवार

**मेष**
कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील. मनोरंजनावर खर्च होईल. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील.

**वृषभ**
पत्नीपासून लाभ मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये सहयोग द्यावा लागू शकतो.मानसिक स्थिरता वाढेल. मान-सन्मानात वाढ होईल.

**मिथुन**
विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. ध्येयाची पूर्ती आपणास करायची आहे ते लक्ष्य निर्धारीत करा.

**कर्क**
नवीन करार होतील. आरोग्य उत्तम राहील.लेखन कार्यातील अडचणी दूर होतील. महत्वाच्या कामांमध्ये सुरळीतरीत्या सहयोग मिळेल.

**सिंह**
शत्रू पराभूत होतील. व्यापार-व्यवसायात सुखद स्थितीचे वातावरण राहील. वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे.

**कन्या**
पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल.

**तूळ**
कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. मान-सन्मानात इच्छानुरूप वाढ होईल. प्रेम संबंधांमध्ये स्थिती होकारात्मक राहील. मित्रांच्या मदतीने कार्ये पूर्ण होतील.

**वृश्चिक**
आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे. ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील. मित्रांचा आधार घेऊन कार्य करा.

**धनु**
आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील. मान-सन्मानात वाढ होईल. आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी दिवस सर्वांत उत्तम आहे.

**मकर**
आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल. दिवस आनंदात व्यतीत होईल. राजकीय कार्ये होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

**कुंभ**
व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. प्रवास काळजीपूर्वक करा. आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. कौटुंबिक

**मीन**
आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो. आपल्या क्रोधावर संयम ठेवा आणि सहकार्यांबरोबर वादाची स्थिती टाळा.

# पेण पोलीसांनी गोमांस वाहतुक करणा-या आरोपींना केले जेरबंद



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी) :** दि.२५ : पेण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३२४/२०२४ भा.न्या.सं. कलम ३२५, ३(५) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे सुधारीत अधिनियम २०१५ चे कलम ५(अ), ५ (क), ९, ९ (अ) तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलीम १९२ (अ) हा गुन्हा १५ डिसेंबर रोजी दाखल आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाबाबत पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक रायगड यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे व पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे पेण पोलीस स्टेशनकडील पोलीस उपनिरीक्षक समद बेग तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार या गुन्हयाचा तपास करीत आहेत. सदर गुन्हयातील टेम्पो कमांक एमएच ०५/एफ जे १५११ मध्ये ६,९८,०००/- रूपये किंमतीचे ३४९० किलोग्रॅम वजनाचे गोवंशीय जनावरांचे मांस मिळुन आल्याने ते वरिष्ठांच्या आदेशान्वये नष्ट करण्यात आले आहे. तसेच टेम्पो कमांक एमएच ०५/एफ जे १५११ जप्त करण्यात आला आहे. गुन्हयातील अज्ञात आरोपींचा शोध घेत असताना टेम्पो कमांक एमएच ०५/एफ जे १५११ चे मालक साजीद लायक कुरेशी रा. रसुल बिल्डींग, कुरेशीनगर, कुर्ला पुर्व, मुंबई असे असल्याचे समजले. गुन्हयातील आरोपी अफसर मेहबुब कुरेशी वय-३९ वर्ष, रा.रूम नं. ५, कुरेशीनगर, कब्रस्तान रोड, रज्जब शेठ चाळ, कुर्ला पुर्व, मुंबई, नजरुद्दिन निजामुद्दिन खान वय- ४८ वर्ष, रा.रूम नं.११, अब्बास शेठ चाळ, कुरेशी नगर, कब्रस्तान रोड, कुर्ला पुर्व, मुंबई, साजीद लायक कुरेशी वय-४३ वर्ष, रा.रूम नं. १२.१३, बिल्डींग नं. ३९, गुलाम रसुल चाळ, कुरेशीनगर, कुर्ला पुर्व मुंबई यांची माहिती घेउन चौकशी अंती त्यांचा सदर गुन्हयात सहभाग असल्याची खात्री झाल्यावर त्यांना दिनांक १९ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली असुन त्यांची २६ डिसेंबर रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली आहे. गुन्हयातील पाहीजे आरोपीत यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. सदर गुन्हयाचे तपासामध्ये पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांचे मार्गदर्शनाखाली पेण पोलीस स्टेशनकडील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोसई समद बेग व सहा. फौजदार राजेश पाटील, पोह/१०४१ राजेंद्र भोनकर, पोह/८७३ संतोष जाधव, पोह/८६१ प्रकाश कोकरे, पोह/१५६८ अजिंक्य म्हात्रे, पोह/१४२४ सुशांत भोईर, पोह/८८५ सचिन व्हसकोटी, पोना/२३१९ अमोल म्हात्रे व पोशि/१९५१ गोविंद तलवारे हे काम करीत आहेत.

# भिवंडी बापगावं येथील निर्जन ठिकाणी १३ वर्षीय अल्पवयीन मुलीची निर्घृण हत्या

## मृतदेह आढळल्याने खळबळ...



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/भिवंडी(प्रतिनिधी) :** दि.२५ : भिवंडी व कल्याण सीमेवर असणाऱ्या गांधारी पुला नजीकच्या बापगाव या गावातील कब्रस्तान परिसरातील निर्जन स्थळी एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीची निर्घृण हत्या झाल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून घटनेची माहिती मिळताच स्थानिक पडघा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झालेले आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कल्याण शहरातील कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीतील एक १३ वर्षीय अल्पवयीन शाळकरी मुलगी सोमवारी संध्याकाळी चार वाजल्यापासून बेपत्ता असल्याने पालकांनी दिलेल्या तक्रारी वरून पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंद केला होता. या अपहरण झालेल्या मुलीचा शोध स्थानिक कल्याण पोलीस घेत असतानाच मंगळवारी सकाळी या मुलीचा मृतदेह बापगाव येथील कब्रस्तान नजीकच्या निर्जन स्थळी आढळून आला आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार तिची निर्घृण अशी हत्या करण्यात आली असून, तिच्यावर अत्याचार सुध्दा केल्याची माहिती मिळत आहे. भिवंडी व कल्याण परिसरात मागील काही दिवसात अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांच्या घटना वाढल्या असताना ही दुर्दैवी घटना समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.या घटनेची माहिती मिळताच ठाणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक धोंडोपंत स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक भारत तांगडे व गुन्हेशाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे हे घटना स्थळी दाखल झाले आहेत. या घटनेचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

# नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी



कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले.

पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटल बिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते.

१९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# जिल्ह्यात सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम यशस्वीपणे राबवावी

## -जिल्हाधिकारी किशन जावळे

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

दि.२५ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन २०२५ ला भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठेवलेले आहे जे की शाश्वत विकास ध्येयाच्या अपेक्षित कालावधी पेक्षा ५ वर्ष अगोदर आहे. याकरिता राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत विविध मोहिमा राबविल्या जात असून २३ डिसेंबर ते .०३ जानेवारी २०२५ या कालावधीत जिल्ह्यात राबविण्यात येणारी सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम यशस्वीपणे राबवावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.जिल्हा टी बी फोरम व



जिल्हा कोमारबिटी समन्वय समितीची बैठक जिल्हाधकारी यांच्या अध्यक्षतेखाली राजस्व सभागृहात संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील सर्व तालुके व पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये यापूर्वी निश्चित केलेल्या अतिजोखीम ग्रस्त लोकसंख्येत (उदा. झोपडपटटी, विटभट्टी, भटक्या जमाती, कामासाठी स्थलांतरित तसेच खाणीमध्ये काम करणारे, कामगार, बेघर इ. सामाजिक गट तसेच तुरुंग, वृध्दाश्रम, आश्रमशाळा व वसतिगृह, आदिवासी मुलांचे वसतिगृह, मनोरुग्णालय इ.) ही मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत अतिजोखीम ग्रस्त लोकसंख्येचे पथकाद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तसेच सर्व क्षयरोग संशयितांची थुंकी नमुना तपासणी व क्ष-किरण तपासणी करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यामध्ये ५७ सुक्ष्मदर्शीतपासणी केंद्रे व प्रत्येक तालुक्यामध्ये नॅट व क्ष-किरण तपासणी सुविधा उपलब्ध आहे. तसेच पिडी लाईट इंडस्ट्रीज यांच्या सीएसआर निधीतून उपलब्ध झालेली मोबाईल एक्स-रे व्हॅन व महानगर गॅसच्या सीएसआर निधीतून उपलब्ध झालेले हँडहेल्ड एक्स-रे मशिन या करिता उपलब्ध करुन दिलेले आहे. दोन आठवडयापेक्षा जास्त कालावधीचा खोकला तसेच दोन आठवडयापेक्षा मुदतीचा ताप, मागील तीन महिन्यामध्ये वजनात लक्षणीय घट, मागील सहा महिन्याच्या कालावधीत कधीही थुंकीवाटे रक्त पडत असल्यास, मागील एक महिन्यापासून छातीत दुखणे, यापूर्वी क्षयरोगाचे उपचार घेतलेले असल्यास अशी लक्षणे असलेल्या व्यक्तींनी व अतिजोखमीच्या भागात वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींनी स्वतःची थुंकी तपासणी व क्ष-किरण तपासणी करावी असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी रायगड डॉ. सचिन जाधव यांनी केले आहे.

## 'आमदार आपल्या भेटीला' या कार्यक्रमाव्दारे

# नागरिकांच्या समस्यांना तात्काळ मार्गदर्शन आणि प्रतिसाद

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी)**

दि.२५ : डोंबिवली शहर शिवसेना शाखेच्या वतीने आयोजित 'आमदार आपल्या भेटीला' या कार्यक्रमाला विधानसभा क्षेत्रातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आज सोमवार, दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोजी, दुपारी १२:०० ते ३:००वाजेपर्यंत हा कार्यक्रम डोंबिवली शहरातील मानपाडा पथावरील शिवसेनेच्या मध्यवर्ती शाखेत पार पडला.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे नवनियुक्त आमदार श्री. राजेश गोवर्धन मोरे यांना भेटण्यासाठी १०० हून अधिक नागरिकांनी खाजगी तसेच सामाजिक समस्या मांडल्या. यावेळी डोंबिवली शहर, नेतीवली विभाग, एमआयडीसी विभाग, दिवा



शहर, १४ गाव, २७ गाव, शिळफाटा विभाग या भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

सदर कार्यक्रमांमध्ये आलेल्या नागरिकांनी सार्वजनिक समस्यांमध्ये बससेवा, रखडलेली शासकीय कामे, आर्थिक मदत, वैद्यकीय सेवा, शैक्षणिक समस्या, आणि नोकरीसंबंधी प्रश्न मांडले तर

**'आमदार आपल्या भेटीला' या कार्यक्रमामुळे नागरिकांच्या अपेक्षांना नवी दिशा मिळाली असून, आमदार श्री. राजेश मोरे यांचे कार्यक्षेत्रात सकारात्मक योगदान दिसून येत आहे. शिवसेना - डोंबिवली शहर मध्यवर्ती शाखा.**

खाजगी समस्यांमध्ये आर्थिक फसवणूक, शिफारसपत्र, शासकीय योजनांचा लाभ मिळवणे यांसारख्या प्रश्नांवर चर्चा झाली. यावेळी नागरिकांच्या समस्यांना त्वरित प्रतिसाद देत आमदार श्री. राजेश मोरे यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून अनेक समस्यांचे निराकरण केले. पोलीस विभाग, तहसील कार्यालय, महानगरपालिका, रेशनिंग कार्यालय, शैक्षणिक विभाग यांसह विविध शासकीय यंत्रणांशी संवाद साधून नागरिकांच्या कामांना गती दिली.

या कार्यक्रमाला शिवसेना, महिला आघाडी, युवा सेनेचे पदाधिकारी, नगरसेवक/ नगरसेविका, बंधू भगिनी तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते. नवनियुक्त आमदारांचे अभिनंदन आणि शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांनीही गर्दी केली.

पहिल्याच कार्यक्रमात अनेक प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांमध्ये समाधान दिसून आले. आमदारांनी दाखवलेल्या तत्परतेने व संवेदनशीलतेने उपस्थित नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले.

## 'सुशासन सप्ताह' अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय येथे

# जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी)**

दि.२५ : दैनंदिन कामकाजाच्या माध्यमातून आपल्या शासकीय कार्यालयाची उत्तम प्रतिमा निर्माण व्हायला हवी. त्याबाबत एक व्हिजन ठेवून काम करणे आवश्यक आहे, सुशासन सप्ताहाच्या निमित्ताने आपल्या सर्वांना ही सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निवृत्त सनदी अधिकारी ॲड. श्यामसुंदर पाटील यांनी आज येथे केले.

दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत 'सुशासन सप्ताह' साजरा केला जात आहे. या अभियानांतर्गत विविध शासकीय विभाग/कार्यालयाकडून शिबिरे आयोजित करून, देण्यात येणाऱ्या विविध सेवा, प्राप्त/ प्रलंबित तक्रारी अर्जावर कार्यवाही करून, जलदगतीने निपटारा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. यानिमित्ताने 'सुशासन सप्ताह'अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालया तील नियोजन भवन येथे 'जिल्हास्तरीय कार्यशाळा'आज (दि.२३ डिसेंबर) आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) श्री.मल्लिकार्जुन माने, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, तहसिलदार श्री.किशोर मराठे, श्री.थोरात, ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी श्रीम.सावंत व विविध शासकीय विभागांचे जिल्हास्तरीय अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.निवृत्त सनदी अधिकारी ॲड. श्यामसुंदर पाटील पुढे म्हणाले की, सुशासन हा तसा



**दैनंदिन कामकाजाच्या माध्यमातून कार्यालयाची उत्तम प्रतिमा निर्माण व्हायला हवी - निवृत्त सनदी अधिकारी श्यामसुंदर पाटील**

गहन विषय आहे. पूर्वी आपण रेल्वेचे तिकीट काढताना तास न् तास रांगेत उभे राहायचो परंतू गतिमानता, उत्तरादायित्वामुळे व पारदर्शकतेमुळे आता सेवा संगणकीय स्वरूपात तात्काळ उपलब्ध होवू लागली आहे. शासकीय कामकाजात पारदर्शकता, गतिमानता आली आहे. जनतेचा सहभाग महत्वाचा आहे. शासनात कायद्यांबाबत सर्वांना समान संधी दिली जाते. कार्यक्षमतेबाबत सर्वांना समान न्याय दिला पाहिजे व त्याची अंमलबजावणी व्यवस्थित करता आली पाहिजे. ठाणे जिल्हयात जनतेच्या तक्रारी येत असतात मात्र या तक्रारींचा जिल्हा प्रशासनाकडून निपटाराही केला जातो. सेतू केंद्र तसेच विविध अभियानांच्या माध्यमातून दुर्बल आर्थिक घटकांसाठी ग्रामीण क्षेत्रात पोहोचणे गरजेचे आहे. जनतेला केंद्रस्थानी ठेवून डिजिटल सेवा प्रभावीपणे पुरविणे, ही काळाची गरज आहे. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेवा बाबत काम करण्याची संधी उपलब्ध होत आहे. यूटयूब, फेसबुक, एक्स, माहिती व तंत्रज्ञान, दुर्बल घटकांपर्यंत पोहोचायला हवे. ठाणे जिल्हा हा आदिवासी ते शहरी व ग्रामीण क्षेत्रात विखुरला आहे. यात सध्या माझी वसुंधरा, वनहक्क, मतदारयादी अद्ययावत करणे अशा विविध प्रकारची कामे ठाणे जिल्हा प्रशासनाने उत्कृष्टरित्या केली आहेत.

उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने यांनी लोकसभा व विधानसभा निवडणूक नुकतीच पार पडली असून या पार्श्वभूमीवर मतदार नोंदणी, त्याचप्रमाणे सर्वसमावेशकता म्हणजे काय या विषयावर आपले मत व्यक्त केले. यावेळी मतदान वाढविण्याबाबत तृतीय पंथ, आदिवासी गट, बेघर मतदार, दिव्यांगांनी दिलेल्या योगदानाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

या कार्यशाळेच्या निमित्ताने केलेल्या प्रस्तावनेत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ या काळात सुशासन सप्ताहाबाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजन करण्यामागचा हेतू स्पष्ट केला. ते म्हणाले की, सर्व शासकीय विभाग कामकाज करीत असतात. परंतू नियमित अहवाल सादर न केल्यामुळे आपल्या कामाची नोंद होत नसते. त्यामुळे आपल्या जिल्ह्याची उदिष्ट्यपूर्ती झालेली दिसून येत नाही. आपण जनतेला सेवा देत असताना ई-सेवा केंद्र, आपले सरकार पोर्टलद्वारे विविध योजना राबवित असतो. झालेल्या कामकाजाचा अहवाल नियमित पाठविल्यास केंद्रशासनाकडून दखल घेतली जाईल.यावेळी ठाणे महानगर पालिकेमार्फत स्मार्ट सिटी, वॉटर सप्लाय, रेल्वे स्थानक, अर्बन रेस्टरुम, तलाव, डिजी ठाणे ॲप, अमृत योजना या क्षेत्रात होत असलेल्या कामांचे सादरीकरण श्री.गायकवाड यांनी केले. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी श्रीम.सावंत यांनी माझी वसुंधरा अभियानाचे हे पाचवे वर्ष असून भूमी, अग्नी, वायू, जल, प्रदूषण, आकाश त्याचबरोबर वृक्ष लागवड, हरित आच्छादन, ओला सुका/ कचरा, हवा गुणवत्ता, ई-बसेस योजना, डिप क्लिनिंग, खत घनकचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा या विषयांवर बचतगट व विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेऊन उपक्रम राबविणे, नागरिकांचा सहभाग घेणे, ई-शपथ माहिती अपलोड करणे अशा अनेक विषयांवर सादरीकरण केले. यावेळी तहसिलदार किशोर मराठे यांनी सर्व मान्यवरांची ओळख करून दिली तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# २७-२८ डिसेंबर दरम्यान राज्यात मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता

## शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेवून नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी) :** दि.२५ : कालपासून राज्यातील विविध भागांमध्ये काही प्रमाणात आभाळी हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. २६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतील दक्षिणेकडील तुरळक भाग; २७ डिसेंबर रोजी खानदेश (नाशिक विभाग), मध्य महाराष्ट्र (पुणे विभाग), उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भातील विविध ठिकाणी; आणि २८ डिसेंबर रोजी खानदेश, मराठवाडा (प्रामुख्याने उत्तरेकडील जिल्हे), आणि विदर्भातील काही भागांमध्ये मेघ गर्जनेसह पावसाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या भागातील शेतकऱ्यांनी कृषी सल्ला आणि हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेवावे आणि त्यानुसार नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

# सायबर स्कॅमची अद्ययावत यादी

## ते धोके ओळखा आणि यापासून दूर राहा



१. जर तुम्हाला ट्राय (टेलिफोन अ‍ॅथॉरिटी) कडून तुमचा फोन कसा डिस्कनेक्ट करणार आहे याबद्दल सांगितले गेले, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

२. जर तुम्हाला फेडएक्सने पॅकेजबद्दल बोलावले आणि मोबाईलवर १, ९ किंवा काहीही बटण दाबण्यास सांगितले, तर दाबू नका. तुमचा फोन हॅक होऊ शकणारा हा स्कॅम आहे.

३. जर एखादा पोलीस अधिकारी तुम्हाला फोन करून तुमच्या आधार कार्डबद्दल बोलत असेल, तर प्रतिसाद देऊ नका. पोलिसांतर्फे असे कधीही कॉल वर विचारले जात नाही. हा स्कॅम आहे.

४. जर ते तुम्हाला सांगत असतील की तुम्ही 'डिजिटल अरेस्ट' मध्ये आहात, आणि कुणालाही कॉल करू नका, जिथे आहात तिथून हलू नका पुढचे ४८ तास ! तर याला प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

५. जर ते तुम्हाला सांगत असतील की तुमच्यासाठी पाठवलेल्या किंवा तुम्ही पाठवलेल्या एखाद्या पॅकेजमध्ये ड्रग्ज सापडली आहेत, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. (लक्षात ठेवा.... कर नाही तर डर कशाची) हे विसरू नका !

६. जर ते म्हणाले की, तुमचा मुलगा / मुलगी ॲक्सीडेन्ट मध्ये सापडला असून आता आमच्या हॉस्पिटल मध्ये आहे, पंधरा मिनिटात ऑपरेशन करावे लागेल, तर तोवर टोकन मनी म्हणून अमुक इतके पैसे पाठवा ! तर अजिबात पाठवू नका ! हा स्कॅम आहे. त्यासाठी आधी मुलाला कॉल करून खात्री करून घ्या. मग कळेल की तो तर ऑल रेडी सेफ आहे..... कॉलेजात / कँटीन मध्ये !

७. जर ते तुमच्याशी व्हॉट्सॲप किंवा एसएमएसद्वारे संपर्क साधत असतील, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. (शक्यतो अननोन नम्बरवरून आलेले कोणतेही कॉल अटेंड करू नका ! व्हिडीओ कॉल तर मुळीच करू नका अटेंड !

८. जर कोणी तुम्हाला फोन करून सांगितले की त्यांनी चुकून तुमच्या यू. पी. आय. आयडीवर पैसे पाठवले आहेत आणि त्यांना फक्त त्यांचे पैसे परत हवे आहेत, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. तुमच्याकडे ते शंभर रुपये पाठवतील आणि लिंक अथवा क्यू आर कोड देतील आणि सांगतील की इथे रिटर्न करा ! ते अजिबात करू नका ! त्यातून तुमचा फोन हॅक करून तुमचे अकाउंट 'रिकामे' करण्याचा हा स्कॅम आहे !

९. जर कोणी तुमची गाडी किंवा तुमचे वॉशिंग मशिन किंवा तुमचा सोफा विकत घ्यायचा आहे असे म्हणत असेल आणि ते लष्कर किंवा सी. आर. पी. एफ. चे आहेत असे म्हणत असेल आणि तुम्हाला त्यांचे ओळखपत्र दाखवले तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

१०. जर कोणी म्हणत असेल की ते स्विगी किंवा झोमॅटोवरून फोन करत आहेत आणि तुम्हाला १ किंवा इतर कोणताही नंबर काहीही दाबून तुमच्या पत्त्याची पुष्टी करण्याची आवश्यकता असेल तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे.

११. जर ते तुम्हाला फक्त ऑर्डर रद्द करण्यासाठी किंवा प्रवासासाठी किंवा जे काही करण्यासाठी ओ. टी. पी. शेयर करण्यास सांगत असतील, तर प्रतिसाद देऊ नका. हा स्कॅम आहे. कोणत्याही परिस्थितीत, तुमचा ओ. टी. पी. कोणाशीही फोनवर शेअर करू नका.

१२. व्हिडिओ मोडवर कोणत्याही कॉलला कधीही उत्तर देऊ नका. त्यासाठी वाटलं तर अशावेळी तुमच्या मोबाईलचा स्क्रीन छताकडे धरून पहा. समोरून कोण कसल्या अवस्थेत (न्यूड टाईप) बोलत असेल तर तुम्हाला ते दिसेल पण त्यांना तुम्ही दिसणार नाही त्यामुळे नंतर होणारे इमोशनल ब्लॅक मेल थांबेल ! नंतर त्या नंबरला लगेच ब्लॉक करा !

१३. तरी गडबडीत तुम्ही त्याला रीस्पॉन्ड केला जरी तरी आणि तो गोंधळ झाल्यास फक्त तो नंबर ब्लॉक करा. आणि थोडा वेळ तुमचा मोबाईल बंद ठेवा.

१४. निळ्या रंगात लिहिलेल्या कोणत्याही लिंकवर कधीही घाईघाईत क्लिक करू नका ! पाठवणारा माहितीतील आहे का ते आधी चेक करा नाहीतर सरळ तो मेसेज डिलीट करून त्या नंबरला ब्लॉक करा

१५. जरी तुम्हाला सर्वोच्च अधिकारी पोलिस (डिपार्टमेंट), सी. बी. आय., ई. डी., आय. टी. विभागाकडून नोटीस पाठवली आहे असं कॉल / मेसेज करून सांगितलं असलं तरी पॅनिक होऊ नका ! संबंधित खात्याच्या अधिकृत वेबसाईटवर जाऊन त्याची आधी खात्री करून घ्या. कारण या विभागातर्फे असे कधीही कॉल / मेसेज करून नोटीस पाठवली जात नाही. अधिकृत पोस्टातर्फे तरी येते किंवा त्यांची माणसे फिजिकली नोटीस घेऊन येतात. हे विसरू नका !

१६. अशी पत्रे सरकारी पोर्टल्समधून आली आहेत का ते नेहमी तपासा कारण अनेकदा खाजगी कुरियर तर्फे हि येतात जी डुप्लिकेट असतात. सरकारी नोटीस कधीही खाजगी कुरियर कडून येत नाही.

१७. जर कोणी तुम्हाला उप-समन्स (अमेरिकेचे कॉल समन्स ऑफ कोर्ट हे उप-समन्स) असे सांगत फोन करत असेल आणि तुम्हाला येऊन ते गोळा करावे लागेल किंवा ते पाहण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील, तर त्याला/तिला समन्स किंवा खटल्याच्या फाईलवर संबोधित करण्यासाठी न्यायालयाच्या प्रोसेस सर्व्हरद्वारे किंवा नोंदणीकृत पोस्टद्वारे पाठविण्यास सांगा. जर ते तुम्हाला धमकावत असतील, तर त्या व्यक्तीचा वेळ वाया घालवा. तसेच न्यायाधीशाचे नाव, न्यायालयीन खोली क्रमांक आणि मजला आणि/किंवा इमारत क्रमांक विचारा-जर ती व्यक्ती सांगू शकत नसेल, तर याचा अर्थ असा आहे की हा एक खात्रीलायक स्कॅम आहे.

१८. जर कोणी फोन करून म्हणतो की तो/ती पोलिस ठाण्यातून फोन करत आहे आणि तुम्हाला बोलावले जात आहे, तर त्याला/तिला ते स्थानिक पोलिस ठाण्यात पाठवण्यास सांगा (तुमचे ठिकाण/शहर उघड करू नका) आणि स्थानिक पोलिस स्टेशनला ते तुम्हाला देऊ द्या.

१९. क्रेडिट / डेबिट / आधार कार्ड क्रमांक, सीव्हीव्ही, मुदत संपण्याची तारीख यासह कोणत्याही डेबिट/क्रेडिट/रुपे कार्ड तपशीलासह कोणालाही कधीही देऊ नका !

२०. ट्रूकॉलर मिळवा. स्पॅम किंवा फसवणूक असे चिन्ह असलेले कॉल उचलू नका. या श्रेणीत येणारे सर्व कॉल ब्लॉक करा.

२१. 'तुमचे बाबा / आई म्हणाली म्हणून आणि त्यांनी सांगितले म्हणून मी तुम्हाला इतकी आणि इतकी रक्कम पाठवली आहे,. चेक करून सांगा ' अशी माहिती देणारे कोणतेही कॉल डिस्कनेक्ट करा. तुम्हाला पैसे पाठवत असलेल्या 'खऱ्या' व्यक्तीला फोन करा आणि खात्री करा. मात्र, त्यांनी एखादी लिंक पाठवली असेल तर त्यावर अजिबात क्लिक करू नका किंवा क्यू. आर. कोड स्कॅन करू नका किंवा ओ. टी. पी. शेअर करू नका.

२२. कोणी प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्राला आपत्कालीन/आजारपण/अपघाताची माहिती देण्यासाठी फोन केल्यास, पैसे पाठवण्यास/जमा करण्यास सांगत असल्यास तसे काहीही करू नका. जरी तो व्हिडिओ कॉल किंवा व्हॉईस कॉल असला तरीही. प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्र/त्यांच्या कुटुंबियांना स्वतः थेट फोन करा आणि खात्री करा. जर त्या व्यक्तीपर्यंत पोहोचता येत नसेल, तर स्वतः गुगल करा आणि रुग्णालयाला फोन करा आणि चौकशी करा. शक्य असल्यास त्या ठिकाणी शारीरिकरीत्या पोहोचा.

२३. समभाग (शेयर्स) किंवा क्रिप्टोकरन्सी खरेदी करण्याचा सल्ला देणाऱ्या कोणत्याही कॉल/संदेशांना प्रतिसाद देऊ नका. असा साठा खरेदी करू नका कारण 'निश्चित नफा' अपेक्षित आहे. जो तुम्हाला भासवला जातो पण रियल मध्ये कधीही तो तुम्हाला मिळत नाही. उलट जे पैसे गुंतवले ते सगळे घेऊन हे भामटे फरार होतात.

२४. 'वर्क फ्रॉम होम' करण्याचे आश्वासन देणाऱ्या कॉल/संदेशांना शक्यतो प्रतिसाद देऊ नका. ते तुम्हाला जाळ्यात अडकवतात, तुम्हाला 'नफा' दर्शविताना 'गुंतवणुकीसाठी' पैसे पाठवतात. कधीही नफा मिळत नाही. हा स्कॅम आहे.

२५ जर तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीचा/नातेवाईक/मित्राचा वेदनादायक आवाज ऐकू आला, मदत मागत असेल तर पॅनिक होऊन लगेच घराबाहेर पडू नका. खास करून रात्रीच्या वेळी. बाहेर कोण आहे याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करा. प्रिय व्यक्ती/नातेवाईक/मित्राच्या मोबाईलवर/घरी फोन करा. गरज भासल्यास पोलिसांना बोलवा. कारण असं इमोशनली गुंतवून बाहेर बोलावून लुटण्याचा हा स्कॅम आहे.

२६. 'सोप्या कर्जाच्या' ॲप्सच्या जाळ्यात अडकू नका. तुम्ही परत करू शकत नाही अशी अनेक कर्जे घेण्यासाठी ते हळूहळू तुम्हाला फसवतात. कधीकधी, ते मोठ्या परताव्याचे आश्वासन देतात आणि तुम्हाला गुंतवणुकीसाठी कर्ज देतात. कधीही नफा मिळत नाही. तुम्ही गुंतवलेले पैसे गेले आहेत. तुम्ही केवळ काही घोटाळ्यात गुंतवणूक करण्यासाठी कर्ज घेता. तुमची 'गुंतवणूक' नष्ट होईल परंतु कर्ज आणि व्याज भरण्यासाठी तुम्ही जबाबदार असाल.

अशा रीतीने फसवणूक झालेल्या अनेक तरुणांनी शेवटी आत्महत्या केल्यात. इतकं हे भीषण आहे.

२६. लक्षात ठेवा की सायबर भामट्याकडून कधीही काहीही मोफत मिळत नाही. 'सोपे पैसे/परतावा/एकदा आजीवन सौदा'... असे काहीही नाही. आणि, जर तुम्ही अमली पदार्थ/बंदी घातलेली औषधे/बनावट पारपत्र/बेकायदेशीर शस्त्रे आणि दारूगोळा/मानवी तस्करी किंवा मनी लॉन्ड्रिंगसारख्या इतर गुन्ह्यांचा व्यवहार करत नसाल तर तुम्हाला घाबरण्याची गरज नाही! !

२७. अशा फसवणूक करणार्यांना माहिती देण्यासाठी सोबत लिंक देतोय. तिथं तक्रार दाखल करा **https://cybercrime.gov.in /** तसेच १९३० या नम्बरवर संपर्क साधून तक्रार दाखल करा !

**लक्षात ठेवा-** कोणतेही न्यायालय/पोलिस स्टेशन/सरकारी तपासणी एजन्सी तुम्हाला फोन करून माहिती देत नाहीत किंवा आदेश काढून बोलवू पण शकत नाहीत. -ते कागदी पद्धतीने सरकारी नियमात राहून काम करतात.

शेवटचं एकच सांगतो.... काहीही घडो... मन शांत ठेवा, पॅनिक होऊ नका !

तुम्ही पॅनिक झालात की त्या भामट्याचे काम निम्मे सोपे होते मग हिप्नोटाईज पद्धतीने ते तुम्हाला गोंधळून टाकतात आणि लुटतात.त्यामुळे पॅनिक होऊ नका ! प्रसंगी सायबर सेल अथवा सायबर एक्सपर्ट चा सल्ला घ्या ! सावधान रहा सजग रहा..

# नूतन विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमातून लोककलेचा जागर




**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)**

दि.२५ : छत्रपती शिक्षण मंडळ संचालित नूतन संकुल कल्याण कर्णिक रोड येथे नुकत्याच झालेल्या सांस्कृतिक स्नेहसंमेलनात अतिशय वैशिष्ट्यपूर्ण जागर लोककलेच्या कार्यक्रमातून शालेय विद्यार्थ्यांनी सादर केला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे रेजन्सी ग्रुपचे महेश अग्रवाल हे उपस्थित होते. यावेळी शालेय जीवनात विविध कलागुणांना संधी भेटते त्यातूनच भावी कलाकार घडतात म्हणून शालेय विविध कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलाच पाहिजे अशा भावना व्यक्त करून कार्यक्रमाला अग्रवाल यांनी शुभेच्छा दिल्या.या सांस्कृतिक कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकही सहभागी झाले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कलाशिक्षक श्रीहरी पवळे आणि विद्यार्थ्यांनी करत धमाल उडवून दिली.

हरवलेली नाथ छकुली शोधण्यासाठी विविध लोक कलेचा प्रवास दाखविला. नूतन संकुल कल्याण पूर्व प्राथमिक प्राथमिक आणि माध्यमिक विभागाचे सर्व विद्यार्थी पालक आणि माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका भारती वेदपाठक, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका दिपाली साबळे, सांस्कृतिक प्रमुख श्रीहरी पवळे, संजय मंजुळे आणि सर्व शिक्षकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. पाहुण्यांचे स्वागत सूत्र संचालन मिताली बोकील यांनी केले.

## सायबर फसवणुकीतील ४ कोटी ६५ लाख वाचवण्यात पोलिसांना यश

मुंबई : सिम स्वॅपिंगद्वारे खासगी कंपनीच्या मालकाची फसवणूक करण्यात आलेली चार कोटी ६५ लाख रुपयांची रक्कम वाचवण्यात मुंबई सायबर पोलिसांना यश आले. आरोपींनी कांदिवलीतील या व्यावसायिकाच्या खात्यातून साडेसात कोटी रुपये हस्तांतरित केले होते. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिसांच्या १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनी केला असता चार तासांत ही रक्कम वाचवण्यात यश आले.


# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**उद्यान विभाग**

**(महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८.३ (क) नुसार)**

## जाहीर नोटीस

भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी याव्दारे तमाम नागरीकांना जाहीर नोटीसव्दारे कळवितो की, भिवंडी नि. शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे कामतघर सर्वे नं.८१/१,१५५/९/१ या जागेत मनपाकडुन बांधकामाकरिता BNCMC/B/APL/००१९०, दि.२९/१०/२०२४ ने मे. शक्ती रियल्टी तर्फे श्री कपील पी.पटेल ॲण्ड जनक पी.पटेल कामतघर, भिवंडी यांना दिलेल्या परवानगीनुसार कामाच्या मंजुर नकाशानुसार विकास कामात अडथळा निर्माण करणारे झाडे काढणेची परवानगी मिळणेबाबत मे.शक्ती ग्रुप, ठाणे यांचा इकडील उद्यान आ.क्र./१०४१, दि.१३/१२/२०२४ रोजी अर्ज प्राप्त झालेला आहे.

प्राप्त अर्जानुसार विकसीत कामाच्या ठिकाणावरील बांधकाम स्थळाची पाहणी केली असता उपरोक्त ठिकाणावरील अधिकृत विकास कामांत कडुनिंब ०१, शेवगा -०१, ताड ०३, जांभुळ ०१ व करंज ०१ जातीची एकुण ०७ झाडे अडथळा निर्माण करत असल्याने सदर झाडासंदर्भात नियमानुसार कार्यवाही करावयाची आहे.

तरी महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८.३(क) नुसार सदरच्या जागेसंबंधी व जागेवरील झाडे संबंधी कोणाचा आक्षेप हक्क अथवा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ७ दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह आमच्या कार्यालयात समक्ष सादर करावे. विहीत मुदतीमध्ये हरकत प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ चे (३) नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल व त्यानंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.याची नोंद घ्यावी.

**सही /-**
**(निलेश संखे)**
**वृक्षअधिकारी तथा मुख्य उद्यान अधिक्षक**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी**

**जा.क्र./जसंवि/१६३२**
**दिनांक :- २४/१२/२०२४**


# भिवंडी मनपाच्या सुशासन सप्ताहाची सांगता

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/भिवंडी(प्रतिनिधी) :**




दि.२५ : केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ''प्रशासन गाव की ओर'' या अभियानांतर्गत भिवंडी निजामपूर महानगरपालिकेत १९ ते २४ डिसेंबर या कालावधीत सुशासन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते आज दिनांक २४ रोजी या अभियानाची सांगता झाली. या अनुषंगाने मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांनी नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करणेकामी शिबीराचे आयोजित करण्याचे निर्देश दिले होते.या अभियानात नागरिकांचे अनेक प्रश्न निकाली निघाले.

मा. अतिरिक्त आयुक्त श्री विठ्ठल डाके यांचे अध्यक्षते खाली नबिन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मा.आयुक्त कॉन्फरन्स हॉल येथे दि. २४/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रशासन 'गाँव की ओर कार्यक्रमा' अंतर्गत सुशासन सप्ताह साजरा करणेकामी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यात नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला, ज्या नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्या लवकरात लवकर निवारण करण्याचे निर्देश मा. अतिरिक्त आयुक्त यांनी सबंधीताना दिल्या.


सदर बैठकीस श्री. रोहिदास दोरकुळकर उपआयुक्त (मुख्या.), श्रीम. प्रणाली घोंगे- उपआयुक्त (समाज कल्याण), श्री. जमिल पटेल शहर अभियंता, श्री. संदिप पटणावर काय.अभि. (पा.पु), श्री. नितीन पाटील सहा आयुक्त (निवडणूक), श्री. फरहान नाचन प्र.क. अभियंता, नगररचना, श्री. अजित महाडिक- प्र. सहाय्यक आयुक्त (प्रशासन), श्री. राजेंद्र वरळीकर सहा. आयुक्त (प्र.स.क्र.१), श्री. माणिक जाधव सहा. आयुक्त (प्र.स.क्र.२), श्री. सुनिल भोईर सहा. आयुक्त (प्र.स.क्र.४), श्री. बाळाराम जाधव सहा. आयुक्त (प्र.स.क्र.५) श्री. अनिल प्रधान विधी अधिकारी, श्री.जे.एम. सोनावणे- सार्व.आरोग्य अधिकारी, श्री. मिलिंद पळसुले सहा. आयुक्त (समाज कल्याण), श्री. राजेश गोसावी- आस्थापना वि.प्रमुख.' श्री. प्रकाश राठोड सहा. आयुक्त (शिक्षण) हे उपस्थित होते.

# पाणी चोरांना भिवंडी महापालिकेचा दणका

## विविध ठिकाणी छापे टाकत गुन्हे दाखल

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/भिवंडी(प्रतिनिधी) :**

दि.२५ : १) मौजे नारपोली, तरुण टेक्सटाइल समोर, अजंठा कंपाऊंड, नारपोली-१, भिवंडी या ठिकाणी श्री शहजादे खान (लहन) यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता महानगरपालिकेचा जल वाहिनीला छिद्र पाडून अनधिकृतपणे पाइप लाइन टाकून पाण्याचा टाकीमध्ये पाणी संकलित करून छोट्या टेम्पो मधील टाकीद्वारे डाइंग व सायजिंगला पाणी विक्री करण्याचे (व्यावसायिक वापर) अनधिकृत काम करीत असल्याने त्यांचे विरोधात भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं **(B.N.S)** २०२३ चे कलम ३२४(४), ३२६ (क), ३०३ (२) अन्वये दिनांक २४/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.





२) मौजे नारपोली, एस. एस कॉटन वर्ल्ड समोर, अजंठा कंपाऊंड, नारपोली-१, भिवंडी या ठिकाणी श्री सलामत खान यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता महानगरपालिकेचा जल वाहिनीला छिद्र पाडून अनधिकृतपणे पाइप लाइन टाकून पाण्याचा टाकीमध्ये पाणी संकलित करून छोट्या टेम्पो मधील टाकीद्वारे डाइंग व सायजिंगला पाणी विक्री करण्याचे (व्यावसायिक वापर) अनधिकृत काम करीत असल्याने त्यांचे विरोधात भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं **(B.N.S)** २०२३ चे कलम ३२४ (४), ३२६ (क), ३०३ (२) अन्वये दिनांक २४/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

३) मौजे नारपोली, मालमत्ता क्र २८/जी/२, अजंठा कंपाऊंड, नारपोली- १. भिवंडी या ठिकाणी श्री मुखतार अताउल्ला शेख यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता महानगरपालिकेचा जल वाहिनीवरून सर्विस सेंटर करीता (व्यावसायिक वापर) अर्धा इंच व्यासाचे १ नळ जोडणी अनधिकृत घेतल्याने त्यांचे विरोधात भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं **(B.N.S)** २०२३ चे कलम ३२४(४), ३२६ (क), ३०३ (२) अन्वये दिनांक २४/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई मा प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली उप अभियंता श्री. सरफराज अंसारी यांचे अधिपत्याखाली श्री. विराज भोईर, पथक प्रमुख यांचे मार्फत करण्यात आली

# स्वस्थ भारत योगा केंद्रातर्फे 'जागतिक ध्यान दिन' साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता (कल्याण प्रतिनीधी) -** २१ डिसेंबर हा दिन जागतिक ध्यान दिन म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. आणी पहीले वर्ष म्हणून स्वस्थ भारत योगा केंद्रातर्फे या दिनाचे औचित्य साधून या जागतिक ध्यान दिनाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. उल्हासनगर येथील मयुर लॉन्स येथे स्वस्थ भारत योगा केंद्राचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप होतवानी यांनी उपस्थित साधकांना ध्यानाचे महत्व पटवून सांगितले. अमेरीकेत जेव्हा गुन्हेगारीचे प्रमाण वाढत होते तेव्हा तेथील सरकारने वाढती गुन्हेगारी कमी करण्यासाठी नागरिकांवर सामुहिक ध्यानाचा प्रयोग करून पाहिला आणी ह्या प्रयोगाअंती तेथील गुन्हेगारीचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात कमी झाले.



'महर्षी इफेक्ट 'नावाने हा प्रयोग प्रसिद्ध आहे. त्यामुळे मनाच्या जडणघडणीत ध्यानाचे फार मोठे महत्व आहे असेही प्रदीप होतवानी पुढे म्हणाले. तसेच उपस्थित साधकांकडुन ध्यान केले गेले. या ध्यान दिनाला ५०० हुन अधिक साधक उपस्थित होते.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी